# 'चलेजाव चळवळ' - एक विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा. डॉ. अनंत रिंढे**
इतिहास विभाग प्रमुख
यशवंत महाविद्यालय, सेलू

**सारांश (Abstract) :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये विशेषत: असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ व चलेजाव चळवळ ही महत्त्वपूर्ण आंदोलने झाली. असहकार चळवळ व सविनय कायदेभंग चळवळीच्या तुलनेत चलेजाव चळवळीमध्ये मूलभूत असा फरक दिसून येतो, त्यामुळे चलेजाव चळवळीला भारतीय इतिहासामध्ये विशेष असे महत्त्व आहे. चलेजाव चळवळीला सुरुवात होण्यापूर्वीच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातील महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरु यासारख्या महत्त्वपूर्ण नेत्यांना ब्रिटीश सरकारने अटक केली होती. भारतातील सामान्य जनता स्वयंस्फूर्तीने या चलेजाव चळवळीत सहभागी झाली होती, हे या चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. चलेजाव चळवळीमध्ये सामान्य जनतेने स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतल्यामुळे ब्रिटीश सरकारला कळून चुकले होते की, भारतीयांना स्वातंत्र्य बहाल केल्याशिवाय पर्याय नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून देण्यासाठी पुढील काळात ज्या महत्त्वाच्या योजना अंमलात आणल्या गेल्या त्या चलेजाव चळवळीमुळेच असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या चळवळीमध्ये देशातील अनेक भागामध्ये निघालेले मोर्चे हे शिस्तबध्द होते. या मोर्चातील लोकांनी सरकारी कार्यालयावर हल्ले केले होते परंतु कुठेही गुंडगिरी केली नव्हती. इ. स. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीपेक्षाही या चळवळीचे स्वरुप हे अनोखे होते.

**बीज संज्ञा (Key-words) :**

असफल क्रिप्स योजना, वर्धा ठराव, मुंबई अधिवेशन, चलेजाव ठराव, भारतीय नेत्यांना अटक, सामान्य जनतेचा स्वयंस्फूर्तीने सहभाग, समांतर सरकार स्थापन, महत्त्वपूर्ण योजना व स्वातंत्र्य.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research paper) :**

१. चलेजाव चळवळीचे स्वरुप अनोखे होते हे निदर्शनास आणून देणे.

२. या चळवळीत सामान्य जनतेचा सहभाग स्वयंस्फूर्तीने होता हे अधोरेखित करणे.

३. या चळवळीमुळे ब्रिटीश सरकारला हादरा बसला होता हे सिध्द करणे.

**प्रस्तावना (Introduction) :**

इ. स. १९२० ते इ. स. १९४७ हा तीन दशकांचा काळ भारतीय इतिहासात अतिशय संघर्षाचा आणि चळवळीचा काळ असल्याची नोंद इतिहासकारांनी केलेली आहे. इ. स. १९२० या वर्षी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला नवे वळण लागले होते. इ. स. १९२० मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली असहकार चळवळ सुरु झाली होती. त्यानंतर इ. स. १९३० मध्ये सविनय कायदेभंग चळवळ झाली परंतु ह्या दोन्ही चळवळीच्या तुलनेत इ. स. १९४२ मध्ये भारत छोडो आंदोलन झाले, हे आंदोलन वरील दोन्ही आंदोलनाच्या तुलनेत अनोखे होते. या भारत छोडो आंदोलनात भारतीय सर्वसामान्य जनता स्वयंस्फूर्तीने सहभागी झाली होती.

**क्रिप्स मिशनचे भारतात आगमन :**

व्दितीय जागतिक महायुध्दात मार्च १९४२ मध्ये जपानच्या फौजांनी रंगूनवर ताबा घेतला होता. त्यामुळे भारताच्या पूर्व सरहद्दीला धोका निर्माण झाला होता. केवळ जपानचे आक्रमण थोपविण्यासाठीच नव्हे तर एकंदरीत युध्द प्रयत्नाला मदत मिळावी म्हणून भारताचे संपूर्ण व सक्रिय सहकार्य मिळवण्यास ब्रिटन अत्यंत आतुर झाले होते. भारताचे

सहकार्य मिळविण्यासाठी इंग्लंडचे पंतप्रधान विस्टन चर्चील यांनी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना भारतीयांना सुधारणा देण्यासाठी एक योजना घेऊन भारतात पाठविले. २२ मार्च १९४२ रोजी सर स्टॅफर्ड क्रिप्स हे दिल्लीला आल्यानंतर त्यांनी क्रिप्स योजनेवर भारतीय नेत्यांसोबत चर्चा केली. क्रिप्स योजनेच्या मुळ मसुद्यात प्रांतांना संघराज्यातून फुटून बाहेर पडण्याचा अधिकार असल्यामुळे महात्मा गांधी. पं. जवाहरलाल नेहरु या सर्व नेत्यांनी क्रिप्स योजनेला विरोध केला व क्रिप्स योजना असफल झाल्याचे दिसून येते.

**वर्धा ठराव :**

१४ जुलै १९४२ रोजी वर्धा काँग्रेस कार्यसमितीची बैठक झाली. या बैठकीत 'ब्रिटीशांनी भारत सोडून जावे' अशा मागणीचा ठराव मांडण्यात आला होता. हा ठराव महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरु यांनी तयार केला होता. जर ही मागणी अमान्य करण्यात आली तर काँग्रेस मोठे अहिंसक जनआंदोलन सुरु करेल असे निश्चित करण्यात आले होते. यावर अंतिम निर्णय मुंबई येथील काँग्रेसच्या अधिवेशनात होणार होता.

**करा अथवा मरा चा मंत्र :**

७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथील गौवालिया टँक मैदानावर अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनासाठी भारतातील वेगवेगळया भागातून लाखोच्या संख्येने लोक एकत्र आले होते. ७ ऑगस्ट १९४२ रोजी याच अधिवेशनात अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारीणीच्या बैठकीत हजारो लोकांच्या समोर पंडित जवाहरलाल नेहरु यांनी ब्रिटीशांना उद्देशून 'चले जाव' चा ठराव मांडला होता. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथील या अधिवेशनात १४ जुलै १९४२ चा वर्धा ठराव हा संमत करण्यात आला होता. ८

ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधी आपल्या भाषणातून म्हणाले होते की, भारतातून ब्रिटीश सरकारची अविलंब समाप्ती होणे हे आपल्या मातृभूमीसाठी आणि संयुक्त राष्ट्राच्या ध्येयाच्या सफलतेसाठी अत्यंत आवश्यक आहे. ब्रिटीश शासनामुळे भारताची अधोगती होत आहे. त्यामुळे अखिल भारतीय काँग्रेस कमिटी ही भारतातून ब्रिटीशांनी चालते व्हावे अशी मागणी करीत आहे. याच भाषणातून महात्मा गांधी यांनी सामान्य जनतेला 'करा अथवा मरा' (Do or Die) असा मंत्र दिला होता. या मंत्राचा खरा अर्थ असा होता की, आपण एक तर हिंदुस्थान ला स्वतंत्र तरी करु किंवा तसा प्रयत्न करत असताना मरण तरी पत्करु पण गुलामगिरी सहन करत जिवंत राहणार नाही. त्यानंतर स्वातंत्र्यासाठी अहिंसक चलेजाव चळवळ सुरु करण्याची घोषणा केली होती. काँग्रेस कमिटीने भारतीय जनतेला आवाहन केले होते की, त्यांनी येणाऱ्या संकटाचा सामना साहस आणि धैर्याने करावा. या अधिवेशनात असे जाहीर करण्यात आले होते की, अशीही वेळ येऊ शकते की आदेश जारी करणे किंवा काँग्रेसचे आदेश सामान्य लोकांपर्यंत पोहचू शकणार नाहीत अशावेळी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला स्वत:चे मार्गदर्शक स्वत: व्हावे लागेल.

**काँग्रेसच्या नेत्यांना अटक :**

मुंबई येथील अधिवेशनात उपस्थित झालेला जनसमुदाय पाहून ब्रिटीश शासन हादरले होते. चलेजाव चळवळ सुरु होण्यापूर्वीच नस्तनाबुत करण्यासाठी ९ ऑगस्ट १९४२ रोजी सकाळी महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु यासारख्या प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांना अटक केल्यानंतर चलेजाव चळवळ मोडीत निघेल अशी ब्रिटीश सरकारची धारणा होती परंतु ती चुकीची ठरली.

**चलेजाव चळवळीस सुरुवात :**

'भारत छोडो' ठरावाची व काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांना अटक झाल्याची बातमी ९ ऑगस्ट १९४२ च्या सकाळीच लोकांमध्ये वाऱ्यासारखी परसली होती. या अनपेक्षीत बातमीने जनता चकीत झाली होती. लोकांनी स्वंयस्फूर्तीने हरताळ पाळला, निदर्शने केली व मिरवणूका काढल्या होत्या. नेत्यांच्या सुटकेची मागणी करणाऱ्या घोषणांनी व राष्ट्रीय गीतांनी वातावरण दुमदुमू लागले होते. लोकांच्या झुंडी पाहूनच ब्रिटीश सरकारला कापरे भरले होते.



**ब्रिटीश सरकारची मनमानी :**

९ ऑगस्ट १९४२ पासून ब्रिटीश सरकारचे वटहुकुमांचे राज्य सुरु झाले होते. त्यांनी काँग्रेस पक्षावर बंदी घातली होती. प्रांता-प्रांतात आणि मुंबई नगरात सार्वजनिक सभांवर आणि मोर्चावर प्रतिबंध घालण्यात आला होता. सभा घेण्यासाठी ब्रिटीश अधिकाऱ्यांकडून पूर्वपरवानगी घ्यावी असे घोषीत करण्यात आले होते.

**लोकांचा स्वयंस्फूर्तीने सहभाग :**

काँग्रेसच्या नेत्यांना अटक केल्यामुळे ब्रिटीश सरकारच्या विरोधात प्रचंड निदर्शनांची सर्वत्र लाट उसळली होती. लोकांनी स्वयंस्फूर्तीने आंदोलनात भाग घेऊन सरकारी कार्यालये ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील महाड येथे नाना पुरोहित व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रचंड मोर्चा काढला होता. पुणे शहरातील तरुण, कॉलेजचे विद्यार्थी या निदर्शनात आघाडीवर होते.

संयुक्त प्रांतात बनारस हे विद्यार्थी चळवळीचे मोठे केंद्र होते. या विद्यार्थ्यांनी संयुक्त प्रांताच्या बलिआ जिल्ह्यात जाऊन तेथील कलेक्टरच्या

कार्यालयावर राष्ट्रध्वज फडकविला होता. देशातील अनेक भागांमध्ये निघालेले मोर्चे हे शिस्तबध्द होते. या मोर्चातील लोकांनी सरकारी कार्यालयावर हल्ले केले होते, परंतु कोठेही नागरिकांची लुटालुट केली नव्हती. त्यामुळे इतर चळवळीपेक्षा चलेजाव चळवळीचे स्वरुप अगदी अनोखे होते. ग्रामीण भागात ह्या चळवळीला आळा घालणे ब्रिटीश सरकारला कठीण गेले होते. ब्रिटीश सरकारने ही निदर्शने शस्त्रांच्या बळावर उधळून लावण्याचा पुरेपुर प्रयत्न केला होता परंतु ब्रिटीश सरकारला साम्राज्यसत्तेचा पाया डळमळू लागला आहे हे समजून चुकले होते. अनेक गोपनीय अहवालांमध्ये त्यांनी हे नमुद करुन ठेवल्याचे दिसून येते.

देशातील मोठमोठ्या कारखान्यातील मजूरवर्गाने प्रमुख नेत्यांना अटक झाल्यामुळे ब्रिटीश सरकारचा निषेध करण्याकरिता जमशेदपूर, अहमदाबाद, मुंबई येथील मजुरांनी स्वयंस्फूर्तीने अनेक संप पुकारले होते. ब्रिटीश सरकारने ६ ते ७ आठवड्यात जनतेचा हा उठाव संपुष्टात आणण्याचा प्रयत्न जरी केला असला तरी यामधील काळात अच्युत पटवर्धन, अरुणा आसफ अली, राममनोहर लोहिया, सुचेता कृपलानी, जयप्रकाश नारायण यांनी देशाच्या विभिन्न भागात भूमिगत आंदोलनाचा संघटनात्मक ढाचा तयार करुन भूमिगत आंदोलन चालवून सरकारला जेरिस आणले होते. भूमिगत आंदोलनाशी संलग्न लोकांची संख्या जरी कमी असली तरी त्यांना व्यापक प्रमाणात पाठिंबा मिळत होता. पूल उध्वस्त करणे, टेलिफोनच्या तारा कापणे, रेल्वेच्या पट्ट्या तोडणे हे या आंदोलनाचे मुख्य स्वरुप होते.

चलेजाव चळवळीच्या काळात बलिया, तामलूक, सातारा या ठिकाणी ब्रिटीश सरकारला छेद देऊन समांतर सरकार स्थापन करण्यात आली होते हे चलेजाव चळवळीचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होते. चलेजाव चळवळीमध्ये महात्मा गांधी यांनी जनतेला हिंसात्मक कार्य करण्यास

भडकविले असा आरोप सरकारने महात्मा गांधीवर केल्यानंतर १० फेब्रुवारी १९४३ रोजी गांधींनी २१ दिवसांचा उपवास सुरु केला होता.

६ मे १९४४ रोजी महात्मा गांधी यांना तुरुंगातून मुक्त केल्यानंतर काँग्रेस वर्कींग कमिटीच्या सर्व सदस्यांची १५ जून १९४४ रोजी मुक्तता करण्यात आली. ह्यानंतरच्या कालखंडात ब्रिटीश सरकारने विविध योजना अंमलात आणून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य बहाल केले.

**निष्कर्ष (Conclusion) :**

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जी जनआंदोलने झाली त्यामध्ये 'चले जाव' चळवळ ही अनोखी होती. ती यासाठी की इतर जी आंदोलने झाली त्या आंदोलनाचे नेतृत्त्व एखाद्या व्यक्तीकडे होते परंतु चलेजाव चळवळीमध्ये तसे दिसून येत नाही. ही चळवळ सुरु होण्यापूर्वीच महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु व इतर नेत्यांना अटक करण्यात आली होती. त्यामुळे ह्या आंदोलनात कोणत्याही एका नेत्याकडे नेतृत्त्व नव्हते. सामान्य जनता स्वयंस्फूर्तीने या आंदोलनात सहभागी झाली होती. या चळवळीमध्ये देशातील अनेक भागामध्ये निघालेले मोर्चे हे शिस्तबध्द होते. या मोर्चातील लोकांनी सरकारी कार्यालयावर हल्ले केले होते. परंतु कुठेही गुंडगिरी केली नव्हती. चलेजाव चळवळीमधील लोकांचा उत्साह पाहून ब्रिटीश सरकारला एकप्रकारे हादरा बसला होता त्यामुळेच महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु व काँग्रेसच्या इतर नेत्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली आणि वेगवेगळ्या योजना अंमलात आणून ब्रिटीश सरकारने भारताला स्वातंत्र्य बहाल केले.

**संदर्भग्रंथ सूची :**

गोरेव, आ. आणि व्ला झिम्यानिन. *जवाहरलाल नेहरु.* मुंबई : प्रगती प्रकाशन.

चंद्र, बिपीन. *भारत का स्वतंत्रता संघर्ष.* नवी दिल्ली : हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय.

जवाहरलाल नेहरु वाङ्मय खंड-१ ते ११. नवी दिल्ली : सस्ता साहित्य मंडळ प्रकाशन.

तळवळकर, गोविंद. *सत्तांतर : १९४७.* मुंबई : मौज प्रकाशन.

पारधी, मा. कृ. *स्वातंत्र्याचा लढा.* नवी दिल्ली : नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया.

वाळींबे, वि. स. *सत्तावन्न ते सत्तेचाळीस खंड-२.* पुणे : राजहंस प्रकाशन.

सितारामय्या, बी. पट्टाभी. *काँग्रेस का इतिहास.* नवी दिल्ली : सस्ता साहित्य मंडळ प्रकाशन.